वारसा मराठी प्रेमाचा
प्रवास शंभर वर्षांचा

बृहन्महाराष्ट्र मंडळ
(मध्यवर्ती संघटना, नवी दिल्ली)

# बृहन्महाराष्ट्र मंडळ नवी दिल्ली, शतक गौरव सोहळा, उद्घाटन प्रसंग १२ एप्रिल २०२५

## (सदस्यांच्या प्रश्नांना उत्तरे)

**प्रश्न १. आगामी १२. एप्रिल २०२५ रोजी मंडळाचा कार्यक्रम कश्यासंदर्भात नियोजित आहे ?**

उत्तर: आगामी १२ एप्रिल २०२५ रोजीचा प्रस्तावित कार्यक्रम आपल्या स्थापनेची शंभर वर्षे पूर्ण करीत असलेली आपली प्रतिष्ठित संस्था, बृहन्महाराष्ट्र मंडळाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा म्हणून, वर्षभर चालणाऱ्या शतक गौरव सोहळ्याचे औपचारिक उद्घाटनाचा कार्यक्रम म्हणून नियोजित आहे.

**प्रश्न २. हा कार्यक्रम कुठे होणार आहे ?**

उत्तर: हा उद्घाटन प्रसंग साजरा करण्यासाठी **झाशी** हे ऐतिहासिक शहर निवडले गेले आहे. या निवडी मागे ऐतिहासिक पृष्ठभूमी आहे. चैत्र शु. प्रतिपदा शके १८४८ (गुढी पाडवा) अर्थात दिनांक १३ एप्रिल १९२६ रोजी सुमुहुर्तावर झाशी येथेच केसरीचे संपादक श्री जनार्दन सखाराम उपाख्य तात्यासाहेब करंदीकर यांच्या अध्यक्षतेत मंडळाच्या कार्याचा शुभारंभ झाला होता.

**प्रश्न ३. हा उद्घाटन प्रसंग कोणच्या संस्थेच्या सक्रीय सहभागाने साजरा केला जात आहे ?**

उत्तर: या उद्घाटन कार्यक्रमात झाशी येथील मंडळाची संलग्न संस्था "**महाराष्ट्रीय समिती (रजि.), झाशी**" यांचा सक्रीय आयोजन सहभाग असणार आहे.

**प्रश्न ४. कार्यक्रमाचे स्वरूप कसे असणार आहे आणि कार्यक्रम झाशी येथे कुठे आयोजित होणार आहे?**

उत्तर : कार्यक्रमाचे स्वरूप खालील तक्त्यात नमूद केल्या प्रमाणे आहे, ज्याच्यात अपरिहार्य कारणांमुळे संशोधन होऊ शकते:

| वेळ | कार्यक्रम | कार्यक्रम स्थळ |
|---|---|---|
| सकाळी ०७:०० वा. | प्रभात फेरी / शोभायात्रा (अपेक्षित वेशभूषा)<br>पुरुष : धोतर कुर्ता/ पैजामा कुर्ता<br>स्त्री: नऊवारी/ सहावारी साडी (रंग पिवळा) | श्री गणेश मंदिर पासून महाराणी लक्ष्मीबाई पार्क पर्यंत |
| सकाळी ०९:०० वा. ते १०:०० वा. पर्यंत | स्वल्पहार, चहा | श्री गणेश मंदिर परिसर |
| सकाळी ११:०० | सामुहिक श्री सत्यनारायण महापूजा | श्री गणेश मंदिर सभागृह मंडप |
| दुपारी ०१:०० वा. ते ०३:०० वा. पर्यंत | मध्यान्ह जेवण | श्री गणेश मंदिर परिसर |
| सायंकाळी ०४:०० वा. | उद्घाटन सोहळा | पं. दीनदयाल उपाध्याय सभागृह |
| सायंकाळी ०६:०० वा. | सांस्कृतिक कार्यक्रम | पं. दीनदयाल उपाध्याय सभागृह |
| रात्रौ ०८:३० वा. पासून | स्वरुची भोज | पं. दीनदयाल उपाध्याय सभागृह परिसर |

अविरत ...२

**प्रश्न ५. या कार्यक्रमास कोण उपस्थित राहू शकतात?**

उत्तर: या कार्यक्रमास बृहन्महाराष्ट्र मंडळाचे समस्त आजीव व संरक्षक सभासद, मंडळाच्या सर्व संलग्न संस्थांचे सदस्य आणि अन्य कोणीही मराठी भाषिक व्यक्ती उपस्थित राहू शकतात, सहभागी होऊ शकतात.

**प्रश्न ६. या कार्यक्रमास झाशी शहराच्या बाहेरून येणाऱ्या सभासदांना निवास आणि जेवण व्यवस्था उपलब्ध करून देण्यात येईल का?**

उत्तर: या कार्यक्रमास झाशी शहराच्या बाहेरून येणाऱ्या सभासदांसाठी सहनिवास तत्त्वावर श्री गणेश मंदिर, गणेश बाजार येथे निवास व्यवस्था केली आहे. श्री गणेश मंदिर, गणेश बाजार येथे १३ मोठ्या खोल्या (स्नानगृह सह पाश्चात्य पद्धतीचे शौचालय प्रत्येक खोलीस संलग्न आहे) असून त्यात प्रत्येक खोलीत ५ ते ७ व्यक्ती निवास करू शकतील. येथे लिफ्ट सुविधा उपलब्ध आहे. तसंच आवश्यकता भासल्यास श्री गणेश मंदिर जवळच्याच संगीत विद्यालय आणि लोकमान्य टिळक शाळेत पण निवास व्यवस्था केली जाऊ शकेल.

**प्रश्न ७. निवास सोयी साठी किती शुल्क आकारले जाईल आणि या शुल्कात जेवणाचा ही समावेश असेल का ?**

उत्तर: दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी सकाळ पासून येणाऱ्या आणि १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८:०० वाजे पर्यंत निवासस्थळ सोडणाऱ्या सदस्यांना वर नमूद निवासी सोय करिता रुपये एक हझार मात्र (रु.१०००/-) प्रति व्यक्ति या प्रमाणे शुल्क आकारले जाईल. यात निवास आणि दिनांक १२ एप्रिल २०२५ रोजी चा सकाळचा नाश्ता , दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण याचा समावेश असेल. तसंच दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजी केव्हांही येणाऱ्या आणि १३ एप्रिल २०२५ रोजी सकाळी ८:०० वाजे पर्यंत निवासस्थळ सोडणाऱ्या सदस्यांना वरील निवासी सोय करिता रुपये एक हझार चारशे मात्र (रु.१४००/) प्रति व्यक्ति या प्रमाणे शुल्क आकारले जाईल. यात निवास आणि दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजी चा सकाळचा नाश्ता , दुपारचे जेवण आणि रात्रीचे जेवण याचा समावेश असेल. दिनांक ११ एप्रिल २०२५ रोजीची तसंच दिनांक १३ एप्रिल २०२५ रोजीची सशुल्क भोजन व्यवस्था किमान संख्येत सदस्य असल्यास केली जाऊ शकेल ज्याचे भुगतान थेट आयोजक संस्थेलाच करावयाचे आहे.

**प्रश्न ८. निवासी सोय आरक्षित करण्यासाठी काय करावे लागेल ?**

उत्तर: निवासी सोय आरक्षित करण्यासाठी सर्वप्रथम गुगल फॉर्म लिंक https://forms.gle/33RGxxtrsMpKzXPXA येथे आपली उपस्थिती इच्छा व्यक्त करावी. मार्च महिन्याच्या ११, २१ आणि ३१ तारखेस त्या तारखे पर्यंत इच्छा अभिव्यक्ती केलेल्या व्यक्तींना मंडळाच्या वतीनं व्हॉटसप संदेश माध्यमांतून शुल्क भरणा करण्यासाठी निर्देशित केले जाईल आणि पुढील आवश्यक माहिती दिली जाईल.

**प्रश्न ९. निवासी सोय आरक्षण कधी पर्यंत केले जाऊ शकेल?**

उत्तर : निवासी सोय आरक्षण दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंतच उपलब्धते प्रमाणे केले जाईल.

**अविरत ...३**

**प्रश्न १०. निवासी सोय आरक्षित झाल्याचे कसे कळेल?**

उत्तर: गुगल फॉर्म वर उपस्थिती इच्छा अभिव्यक्त केल्या नंतर प्राप्त निर्देशाप्रमाणे निवासी शुल्क भरणा करून त्याची पावती / स्क्रीनशॉटची प्रत व्हॉटसप्प क्रमांक **८९८९७९२२००** किंवा ईमेल आय.डी. **bmm.officialpublicity@gmail.com** वर आवश्यक रित्या पाठवावी. या पावतीचे बँक सत्यापन करून आरक्षण करून संबंधित सभासदास कळविले जाईल. **ही प्रत प्राप्त झाली नाही तर बँक सत्यापन अभावी निवासी आरक्षण करणे शक्य होणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.**

**प्रश्न ११. निवासी सोय शुल्क कसे भरायचे ?**

उत्तर: सदस्यास हव्या असलेल्या निवासी व्यवस्थेसाठी निर्देशित केल्या प्रमाणे अपेक्षित शुल्क खाली नमूद बँक खात्यात रोख, चेक, ऑनलाईन अंतरण, किंवा UPI एप माध्यमांतून भुगतान करता येईल. बँक खात्याची माहिती खालील प्रमाणे आहे.

खात्याचे नाव : **बृहन्महाराष्ट्र मंडळ**

बँक खाता क्रमांक : **20055234334**

खात्याचा प्रकार : **सेव्हिंग (बचत) खाते**

आय.एफ.एस.सी. कोड : **MAHB0000140**

बँक व शाखा : **बँक ऑफ महाराष्ट्र , करोलबाग शाखा, नवी दिल्ली**

यू.पी.आय. आय.डी. : bmsmn@mahb

BRIHAN MAHARASHTRA MANDAL
UPI ID : bmsmn@mahb

**प्रश्न १२. कोणाला निवासी सोय नको असेल पण कार्यक्रमांना उपस्थित राहायचे असेल तर किती शुल्क आकारले जाईल?**

उत्तर: <u>जर कोणाला निवासी सोय नको असेल पण कार्यक्रमांना उपस्थित राहायचे असेल तर त्या करिता कुठले ही शुल्क आकारले जाणार नाही</u> *<u>पण जर अश्या व्यक्तीस स्वतःची नाश्ता व जेवण व्यवस्था करून हवी असेल तर त्या करिता रु.६००/- (रुपये सहा शे मात्र) एवढे शुल्क झाशी येथेच आयोजक संस्थेकडे भरावे लागतील</u>.*

**प्रश्न १३. झाशी येथील आयोजन स्थळांवर कसे पोहोचायचे?**

उत्तर: श्री गणेश मंदिर, गणेश बाजार तसंच पं.दीनदयाल उपाध्याय सभागृह ही दोन्ही आयोजन स्थळे झाशी रेल्वे स्टेशन हून आणि बस स्थानका पासून अंदाजे 4 किलोमीटर लांब आहेत आणि दोन्ही ठिकाणाकरिता झाशी रेल्वे स्टेशन आणि बस स्थानकापासून ऑटो रिक्षा तसंच ई-रिक्षा रु.१००/- एवढ्या शुल्क मध्ये उपलब्ध असते.

**प्रश्न १४. सामुहिक श्री सत्यनारायण महापूजेत कोण सहभागी होऊ शकतात?**

उत्तर: सामुहिक श्री सत्यनारायण महापूजेत कोणाही सदस्यास एकट्याने किंवा सपत्नीक / पती सह सहभागी होता येईल.

**प्रश्न १५. पूजेसाठी आवश्यक उपकरणी उपलब्ध होऊ शकतील की स्वतः सोबतच आणावी ?**

उत्तर: पूजे साठी आवश्यक उपकरणी पूजास्थळावरच उपलब्ध करवून दिल्या जातील. यद्यपि कोणास स्वतःचीच उपकरणी वापरायची असल्यास त्यांनी ती सोबत आणावी.

**अविरत...४**

**प्रश्न १६. पूजेत सहभागी होण्यासाठी परीधानासंबंधात काही नियम आहेत का?**

उत्तर: पूजेत सहभागी होणाऱ्या पुरुषांनी सोवळे तर महिलांनी सोवळ्यासम रेशमी वस्त्रे परिधान करावी. ही वस्त्रे स्वतः सोबत आणावी.

**प्रश्न १७. पूजे साठी दक्षणा किती आणि कुठे द्यायची ?**

उत्तर: पूजा नैमित्यिक आचार्य दक्षणा रु.१५१/- (रुपये एक शे एकावन्न मात्र) पूजा समयी थेट गुरुजींनाच द्यावयाची आहे. ही दक्षणा निवास सोय, आहार व्यवस्था किंवा अन्य कुठल्याही शुल्कच्या अतिरिक्त असेल.

**प्रश्न १८. पूजेत सहभागी होणाऱ्या सदस्यांसाठी नोंदणी कधी पर्यंत करता येईल ?**

उत्तर : पूजेत सहभागी होणाऱ्या सदस्यांना पूजे साठी नोंदणी दिनांक ३१ मार्च २०२५ पर्यंतच करता येईल.

**प्रश्न १९. वरील प्रश्नांशिवाय कोणाला अन्य काही प्रश्न / शंका असतील तर त्याचे उन्मूलन कसे करायचे ?**

उत्तर: वरील प्रश्नांशिवाय कोणाला अन्य काही प्रश्न / शंका असतील तर त्याच्या उन्मूलनार्थ सदस्यांनी खालील व्यक्तींशी त्यांच्या भ्रमणध्वनीवर किंवा व्हॉटसप्प माध्यमांतून संपर्क करावा:

अ. **श्री संजय तळवलकर (झाशी)**, मुख्य कार्यक्रम संयोजक - **९४५००४१३१५**

आ. **डॉ. प्रमोद जोशी (कानपुर)**, कार्याध्यक्ष शतक गौरव सोहळा समिती – **९४५३२२९४४९**

इ. **पं. षडानन पाठक कारखेडकर** (काशी), विभागीय कार्यवाह (उत्तर प्रदेश विभाग) – **९४५०३५८९६५**

--- **इति** ---